सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक. एच.डी / ११०२३/१/२०२५/ पोल-१अ दि.१६/०९/२०२५

** * *

**विषय :-** एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-C.P.T.11
"पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुकत,गट अ " **याचे** दोन अधिसंख्ये पदे निर्माण करण्याबाबत.

****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक. एच.डी / ११०२३/१/२०२५/ पोल-१ अ, दि.१६/०९/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०९१६१४५८००४७२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 23-09-2025 10:40:46

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-C.P.T.P.11:

"पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ" याचे दोन अधिसंख्ये पदे निर्माण करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांक : क्रमांक : एच.डी.-११०२३/१/२०२५/पोल-१अ**

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : १६ सप्टेंबर २०२५.

**संदर्भ** : (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. असंक-१००१/प्र.क्र. २९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १०.०९.२००१

(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१२/प्र.क्र.१६/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २०.०२.२०१६

(३) शा.नि., गृह विभाग, क्र.रापोसे-२२१७/प्र.क्र.१०४/एक/पोल-१अ, दिनांक २१/०५/२०२५

(४) कार्यालयीन आदेश, सामान्य प्रशासन विभाग, क्र. टिआरएन-११२५/प्र.क्र.३४/प्रशि-२, दिनांक १४.०८.२०२५.

(५) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. अपोमसं/प्रशि-२/CPTP-११/२०२५/१६४८, दिनांक ०५.०९.२०२५.

**शासन निर्णय.**

शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीडब्लूएफ-०२०९/प्र.क्र.१०७/पोल-७, दि.०६.०२.२००९, यामधील तरतुदीनुसार दिनांक ०७.०८.१९९७ रोजी नक्षल विरोधी कारवाईत भूसुरुंग स्फोटात मृत्यू झालेले श्री.पांडु दोगे आलाम यांचा मुलगा श्री. रूपेश पांडु आलाम यांना शासन आदेश, गृह विभाग, क्र.२२१७/प्र.क्र१०४/पोल-१अ, दिनांक २१.०५.२०२५, द्वारे "परिविक्षाधीन पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (निःशस्त्र), गट अ" या पदावर विशेष बाब म्हणून अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. कार्यालयीन आदेश, सामान्य प्रशासन विभाग, क्र. टिआरएन-११२५/प्र.क्र.३४/ प्रशि-२, दिनांक १४.०८.२०२५ द्वारे श्री. रूपेश पांडू आलम यांना "पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र), गट अ" या पदावर दि.०१.०९.२०२५ पासून, एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (C.P.T.P.) अंतर्गत "C.P.T.P. 11" या तुकडीत दोन वर्षांच्या प्रशिक्षणासाठी विवक्षित अटी व शर्तींच्या अधीन राहून परिवीक्षाधीन अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे.

३. तसेच राज्यसेवा परीक्षा २०२२ मधील मुदतवाढ देण्यात आलेल्या श्रीम. प्रणिता कैलास काळे यांना कार्यालयीन आदेश, सामान्य प्रशासन विभाग, क्र. टिआरएन-११२५/ प्र.क्र.३४/प्रशि-२, दिनांक १४.०८.२०२५ , द्वारे "पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस

आयुक्त (नि:शस्त्र), गट अ” या पदावर दि.०१.०९.२०२५ पासून, एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (C.P.T.P.) अंतर्गत “C.P.T.P. 11” या तुकडीत दोन वर्षांच्या प्रशिक्षणासाठी विवक्षित अटी व शर्तींच्या अधीन राहून परिवीक्षाधीन अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे.

४. त्यास अनुलक्षून, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांच्या आस्थापनेवर दिनांक ०१.०९.२०२५ ते ३१.०८.२०२७ या कालावधीकरिता “पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ” (एस २०: ५६१००-१७७५००) याचे ०२ अधिसंख्ये पदे, याद्वारे, निर्माण करण्यात येत आहेत.

५. उक्त अधिका-यांच्या दिनांक ०१.०९.२०२५ ते ३१.०८.२०२७ या कालावधीतील वेतनावरील खर्च हा गृह विभाग-मागणी क्र. बी१, २०५५, पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस (००)(००)(०१), जिल्हा पोलीस बल (अनिवार्य)(दत्तमत) (२०५५ ०१६८), ०१-वेतन, या लेखाशीर्षाखाली उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

६. त्या अनुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी उचित कार्यवाही करावी.

७. हा शासन निर्णय, शा.नि., वित्त विभाग, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि. २०.०२.२०१६, द्वारे प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारांचा वापर करुन, सक्षम प्रधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

८. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०९१६१४५८००४७२९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VENKATESH MADHAV BHAT

Digitally signed by VENKATESH MADHAV BHAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=5f0272b97156a5d2812bad6725ca46fb2671d1da08208cfdd6677fac0afd6bf2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6E277C9088A4CB8B53E535A4642A6800B908C5D8DB3A63175760874EBA717AE1, cn=VENKATESH MADHAV BHAT
Date: 2025.09.16 15:11:11 +05'30'

**(व्यंकटेश भट)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत :-**

(१) महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे.
(२) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
(३) संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
(४) उप सचिव (सीपीटीपी), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
(५) संबंधित परिवीक्षाधीन पोलीस अधिकारी (पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्यामार्फत).
(६) निवड नस्ती,पोल-१अ.

**प्रत :-**

(१) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
(२) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी .